॥ माळ्याच्या मळ्यामधि ॥

गायिकाः उषा मंगेशकर
गायकः जयवंत कुलकर्णी
गीतः दादा कोंडके
संगीतः राम कदम

तोः माळ्याच्या मळ्यामधि कोण ग उभी?

तीः राखण करते मी रावजी,
रावजी हात नका लावु जी, पाहिल कुणी तरी।
औंदाचं ग वरीस बाई मी सोळावं गाठलं
चोळी दाटली अंगाला बाई कापड का फाटलं।
काळिज माझं धड धड करी, उडते पापणी वरच्यावरी
रावजी हात नका लावु जी, पाहिल कुणी तरी ।

तोः नार गोमटी तू देखणी,
ठुसका बांधा ठसला मनीं
फुलराणी जीव माझा साजणी ग जडला तुझ्यावरी।

तोः माळ्याच्या मळ्यामधि कोण ग उभी?

तीः वांगी तोडते मी रावजी, रावजी
हात नका लावु जी, पाहिल कुणी तरी।
गोर्या गालावर ग माझ्या लाली लागली दिसू
अंघोळीला बसले, माझ मलाच येई हसू।
पदर राहिना खांद्यावरी, पिसाट वारं भरलंय उरी
रावजी हात नका लावु जी, पाहिल कुणी तरी।

तोः शुक्राची ग तू चांदणी, लाजु नको ग नाही कुणी
मंजुळा जीव तुझ्यावर खुळा ग झाला खरोखरी।